# महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

**विषय :-** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयामध्ये बचतगटांमार्फत बहुउद्देशिय कामगार पुरविणे बाबत.

**महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

**विषय :- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयामध्ये बचतगटांमार्फत बहुउद्देशिय कामगार पुरविणे बाबत.**

भारताचे मा.पंतप्रधान महोदय यांच्या संकल्पनेतून सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक उपक्रम आणि योजना सुरू केलेल्या आहेत या मध्ये प्रामुख्याने पुढील योजनांचा उल्लेख करता येईल, **राष्ट्रीय ग्रामीण आजिविका अभियान (NRLM), दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजिविका अभियान, महिला आर्थिक सक्षमीकरण योजना, स्वयंसेवी संस्थांची भूमिका, प्रधानमंत्री मुद्रा योजना** इत्यादी योजना कार्यान्वित आहे.

याचा एक भाग म्हणुन **" प्रधानमंत्री लखपती दीदी "** योजना हा भारत सरकारचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे, उक्त योजनांद्वारे महिलांना सामूहिक बचत गट स्थापन करण्यास प्रोत्साहित करणे, महिलांना अर्थसहाय्य, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि कामकाजाच्या संधी उपलब्ध करून देणे. महिलांना स्वरोजगाराचे आणि स्वयंरोजगाराचे संधी उपलब्ध करून, स्थिरता प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे,महिलांना आर्थिक अनुदान, प्रशिक्षण आणि सल्ला प्रदान करणे, महिलांना उत्पादनाची विक्री आणि विपणन यामध्ये सहाय्य करणे, महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देणे इत्यादी व इतर बाबींवर अंमलबजावणी केली जाते, या योजनेचा उद्देश आर्थिक दृष्ट्या असक्षम महिलांना सक्षम बनवून त्यांना उद्योजकतेकडे प्रवृत्त करणे आहे.

या योजने अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शहरातील बचतगटांना महानगरपालिकेत सामावून घेणे आणि त्यांच्या मार्फत बहुउद्देशीय कामगार पुरवण्याचे उद्दिष्ट आहे. आजमितीस महानगरपालिकेत 2,500 नोंदणीकृत बचत गट आहे. महानगरपालिकेतर्फे पुरविल्या जाणा-या सेवांपैकी सार्वजनिक स्वच्छता करणे, बहूउद्देशीय कामगार पुरविणे, सुरक्षा रक्षक पुरविणे इत्यादी व इतर सेवांसाठी राबविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा/ शहर हद्दीत असलेल्या बचतगटांना काम देणे बाबतचा अभिव्यक्ती स्वारस्य प्रगटन मागविण्यात येत आहे.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

I. अर्जासोबत अनामत (EMD) रक्कम रु.१०००/- चा Demand Draft उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख) यांच्या नावाने काढलेल्या ऑफलाईन पध्दतीने निविदा कागदपत्रासह सोबत जोडावा.
II. बचतगट नोंदणी प्रमणापत्र (सदरील बचतगट नोंदणी प्रमाणपत्र हे राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान, छत्रपती संभाजीनग येथील असणे बंधनकारक आहे)
III. बचतगटाकडे भविष्य निर्वाह निधी नोंदणी बंधनकारक आहे .
IV. बचतगटाकडे राज्य विमा नोंदणी बंधनकारक आहे.
V. शासकीय / निमशासकीय / खाजगी क्षेत्रात काम केल्याचे संबंधीत आस्थापनेचे साक्षांकित केलेले गेल्या ८ वर्षातील कोणत्याही 01 वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र, साफ़सफ़ाई/स्वच्छतेचे काम केले असल्यास त्यांना प्राधान्य
VI. पॅन कार्ड व बचतगटाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
VII. नोंदणीकृत बचतगटांकडे सद्यस्थितीत कार्यरत कर्मचा-यांचा तपशील.

उपरोक्त सर्व कागदपत्रे बंद लिफाफ्यात घनकचरा व्यवस्थापन विभागात सादर करावीत.

(जी. श्रीकांत) भा.प्र.से
आयुक्त,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**(सर्वसाधारण अटी व शर्ती)**

1. बचतगटामध्ये सफाई कर्मचारी म्हणून स्वत: काम करणाऱ्या महिला बचतगटास प्राधान्य देण्यात येईल.
2. बचतगटामध्ये किमान ३० व कमाल ४५ सफाई कर्मचारी असणे बंधनकारक असेल.
3. बचतगटाने मासिक अथवा वेळोवेळी येणा-या कार्यादेशाप्रमाणे काम करणे बंधनकारक असेल विभागाच्या मागणी आणि आवश्यकतेनुसार काही कर्मचारी हंगामी स्वरुपात काम करतील. विभागाने मागणी वाढविल्यास ती पुरविणे बंधनकारक असेल. तसेच मागणी कमी झाल्यास ती बचतगटाला मान्य करणे बंधनकारक असेल.
4. सदर प्रक्रियेत पात्र बचतगटांना ४ % दराने मेहेनतानावर सदरील काम करणे बंधनकारक असेल.
5. सफाई कर्मचा-यांचे देयक व भत्ते (D.A. इ.) हे किमान वेतन कायदा व कामगार कायद्यानुसार अदा करण्याची जबाबदारी बचतगटांची असेल तसेच मासिक देयक संचिका सादर करताना संचिकेसोबत कर्मचा-यांचे Pay slip सोबत जोडणे अनिवार्य असेल.
6. सदरील कामाची गुणवत्ता जर समाधानकारक नसेल तर 8 दिवसांची पूर्व सुचना देऊन दिलेले कार्यादेश रद्द करण्यांत येतील व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
7. बचतगटास अस्तित्वात असलेल्या अनुषंगिक सर्व कायद्यांचे पालन करणे बंधनकारक असेल.
8. खाजगी कर्मचा-यांना नियमाप्रमाणे आठवडी सुट्टी देणे बंधनकारक असेल. किमान वेतनामध्ये साप्ताहीक सुट्टीचा (Paid Weekly Off) समावेश असेल.
9. सफाई कर्मचा-यांना नियमाप्रमाणे वार्षिक बोनस देणे बचतगटाची जबाबदारी असेल.
10. सफाई कर्मचा-यांचा अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी बचतगटाची असेल तसेच कर्मचा-यांकडुन महानगरपालिकेस किंवा इतरांस नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी बचतगटाची असेल.
11. खाजगी कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनांची रक्कम प्रचलित दरानुसार मुख्य मालक म्हणुन महानगरपालिकेतर्फे आपल्या दरात समाविष्ठ करुन त्याचा भरणा संबंधीत कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल.
12. चालु महिन्याच्या देयका सोबत मागिल महिन्याची पी एफ व ईएसआय भरणा केल्याचे चलन आणि वेतन, बँकेत धनादेशाद्वारे अथवा ई बँकिंद्वारे अदा केल्याचा तक्ता देणे बंधनकारक आहे सलग दोन महिन्याच्या पावत्या देयकासोबत दाखल न केल्यास देयकातून एक टक्के (1%) रक्कम दंड म्हणून वसुल केली जाईल, सदरील रक्कम सुरक्षा रक्कमेतुन कपात करून भरण्यात येईल अथवा देयकातुन वळती केली जाईल.
13. नियमीत आस्थापनावरील कर्मचा-यास मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचा-यांना देय असणार नाहीत.
14. कोणत्याही परिस्थितीत खाजगी कर्मचा-यांना मनपाच्या नियमीत आस्थापनेवर सामावून घेण्याची मागणी करता येणार नाही अशी संबंधीताला जाणीव करून देणे हे बचतगट कंत्राटदाराचे काम असेल. संबंधीतांकडून तसे लेखीबंधपत्रक घेवुन त्याची प्रत या कार्यालयात सादर करावी लागेल.
15. बचतगटातील कर्मचारी निवृत्त/मयत झाल्यास अथवा इतर कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या पाल्यांना/नातेवाईकास/इतर यांना परस्पर नियुक्ती देता येणार नाही.
16. अपेक्षीत अर्हता अथवा सफाईचा अनुभव असणारे कर्मचारी पुरवठा करणे बंधनकारक असेल. विभागाने मागणी केल्यास कर्मचारी बदलुन दयावा लागेल.
17. अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मधील अटी व शर्तीवर वाद निर्माण झाल्यास आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर हे निर्णय अधिकारी असतील.

18. बचतगट हे काळ्या यादीत (Black listed) नसावे.

19. प्राप्त अर्जातील कोणताही अर्ज कुठलेही कारण न दर्शविता स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार आयुक्त महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहे.

20. पात्र बचतगटांना निर्धारित कामांकरिता प्रत्येकी र.रु.१,१५,०००/- (अक्षरी एक लक्ष पंधरा हजार रुपये) एवढी सुरक्षा रक्कम ११ महिन्याकरिता मुख्य लेखाधिकारी महानगरपालिका यांच्या नावाने जमा करावी लागेल. सदरील सुरक्षा रक्कमेत प्रत्येक ११ महिन्यांनंतर कामाच्या कालावधीनुसार नुतनीकरण करण्यात येईल.

21. पात्र बचतगटांनी पुरविलेल्या कर्मचाऱ्यांकडुन महानगरपालिकेचे नुकसान झाल्यास मासिक देयकातून कपात करण्यात येईल.

22. पात्र बचतगटाने कार्यारंभ आदेशापुर्वी आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरुन उपआयुक्त महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांचेशी करारनामा करुन दयावा लागेल.

23. पात्र बचतगटांना कामासाठी कार्यक्षेत्र वाटप करणे व त्या संबंधिचे सर्व अधिकार आयुक्त तथा प्रशासक तसेच उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना असतील.

24. बचतगटातील कार्यरत कर्मचा-यांचे वय किमान 18 वर्ष व निवृत्तीचे वय 60 वर्ष असेल.

25. बचतगटांमार्फत नियुक्त होणारे कर्मचारी यांचेवर कोणताही फ़ौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल नसल्याची खात्री करुनच सफाई कर्मचाऱ्यांचे नाव समाविष्ट करावे.

26. कामगारांना स्वच्छता व सुरक्षा साहित्य बचतगटाने उपलब्ध करुन देणे अनिवार्य असेल.

27. कामगारांच्या मासिक वेतनाच्या तीन महिन्याच्या वेतनाची अगाऊ रक्कम स्वतःच्या खात्यामध्ये जमा असल्याचा पुरावा द्यावा लागेल.

28. महानगरपालिके मार्फ़त बचतगटाच्या मासिक देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास कामगारांच्या तीन महिन्यांच्या वेतनाची जबाबदारी बचतगटाची असेल.

29. बचतगटांमार्फत सफ़ाई कर्मचारी पुरविण्याचा कालावधी हा ३६ महिन्यांचा असेल. कामाची गुणवत्ता पाहुन बचतगटांना मुदतवाढ देणे किंवा नविन निविदा प्रक्रिया राबविणे या संबंधिचे सर्व अधिकार मा. सर्वसाधारण सभा /मा. स्थायी समिती सभा यांना असतील.

30. उपरोक्त कामाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास Legal jurisdiction हे मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ असेल.

(जी. श्रीकांत) भा.प्र.से

आयुक्त,

महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

Email:-swm@chhsambhajinagarmc.org

हेल्पलाइनक्रमांक.155304 / 8055128080/ 8055505002

जा.क्र.मनपा/घकव्यवि/2025/ 340

दिनांक:-21 / 05 /2025

**जाहीर प्रगटन**

याद्वारे कळविण्यात येते की, महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रीय कार्यालयांमध्ये बहुउद्देशीय कामगार पुरविणेकरिता अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) प्रकिया राबविण्यात येणार आहे. त्याकरिता इच्छुक महिला बचतगटांना अर्ज करण्यासाठीची आवश्यक सर्व माहिती तसेच अटी व शर्ती महानगरपालिकेच्या https://chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे तसेच महानगरपालिका मुख्यालय टाऊन हॉल व घनकचरा व्यवस्थापन विभाग आमखास मैदान शेजारी नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| अर्ज करण्याची सुरुवात दिनांक | : दि. 22 मे, २०२५. सकाळी ९.४५ वा. पासून |
| अर्ज करण्याची अंतिम दिनांक | : दि. 11 जुन, २०२५. संध्याकाळी ६.०० वा. पर्यंत |
| Pre Bid बैठक दिनांक | : दि. 29 मे, २०२५. सकाळी ११.०० वा. |
| Pre Bid स्थळ | : मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे दालन, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर. |

अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) प्रकियेत काही सुधारणा असल्यास ती https://chhsambhajinagarmc.org या वेबसाइटवर प्रकाशित करण्यात येईल, तसेच महानगरपालिका मुख्यालय टाऊन हॉल व घनकचरा व्यवस्थापन विभाग आमखास मैदान शेजारी नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.

अर्ज करण्याची अंतिम तारखेनंतर कोणत्याही महिला बचतगटाचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही याची सर्व महिला बचतगटांनी नोंद घ्यावी.

उपआयुक्त - 5

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख

महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

o/c

Scanned with CamScanner